////आतील पानात वाचा

- अमोल मुझुमदार क्रांती घडवणारे प्रशिक्षक...
- हॅप्पी बर्थडे किंग कोहली !
- चंद्रपूर कॅन्सर हॉस्पिटलला 'स्व.रतन टाटा' यांचे नाव द्या



दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

आयुष्यातील प्रत्येक
चढ-उतार हे आपल्याला काहीतरी
शिकवत असतात त्यांच्याकडून
शिका आणि पुढे जात रहा...


वर्ष : ०५ | अंक : ८३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०६ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# राज ठाकरे सोबत नको? काँग्रेसच्या गोटात हालचाली सुरु?

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात पडद्यामागे घडामोडींना वेग आला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकीकडे राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाच्या विरोधात रोखठोक भूमिका मांडताना दिसत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र येताना दिसत आहेत. पण ते आगामी मुंबई महापालिका निवडणुकांमध्ये एकत्र येणार का? हे गुलदस्त्यात आहे. असं असलं तरी दोन्ही पक्ष एकत्र निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे. पण मग दोन्ही ठाकरे एकत्र येणं हे काँग्रेसला मान्य असणार का? असा देखील प्रश्न उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे काँग्रेसचे महाराष्ट्रातील काही नेते राज ठाकरेंना सोबत नेण्यासोबत अनुकूल नसल्याची चर्चा आहे. महाराष्ट्र काँग्रेसची हायकमांडसोबत चर्चा होणार आहे. यावेळी महाराष्ट्रातील काँग्रेस नेते हायकमांडला काय सांगतात आणि हायकमांड काय निर्णय जाहीर करणार? याकडे सर्वांचं लक्ष



लागलं आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेस स्वतंत्र निवडणूक लढवण्यावर ठाम असल्याची माहिती टीव्ही ९ ने सूत्रांच्या हवाल्याने दिली आहे. मनसेसोबत युती नको, अशी काँग्रेसची भूमिका आहे. इंडिया आघाडीच्या घटक पक्षांसोबत युती हवी, पण मनसेसोबत युती नको, अशी काँग्रेसची भूमिका आहे. महाराष्ट्र काँग्रेसचा हा स्थानिक पातळीवर निर्णय झाल्याची माहिती आहे. तसेच स्थानिक पातळीवरचा हा निर्णय महाराष्ट्र काँग्रेस हायकमांडला कळवणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. मुंबई काँग्रेस अध्यक्षा वर्षा गायकवाड आणि प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हायकमांडसोबत चर्चा करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. काँग्रेसमधील या घडामोडींवर मनसे नेत्यांना प्रश्न विचारले असता त्यांनी आपली प्रतिक्रिया दिली.

**मनसे नेते बाळा नांदगावकर काय म्हणाले?**

निवडणुकीत कोण कुणासोबत असेल, याबाबत कोणतीही चर्चा नाहीय, अशी प्रतिक्रिया मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी दिली आहे. मनसे नेते नितीन सरदेसाई यांनीदेखील यावर प्रतिक्रिया दिली आहे. कुणाशी युती किंवा आघाडी घ्यायची, असा कुठलाही विषय आमच्या चर्चेत नाही. त्यांनी काय करावं हा आमचा विषय आणि आम्ही काय करावं हा आमचा विषय आहे. मोर्च्यात आपल्याला अनेक जण एकत्र दिसले तरी आम्ही कुणाबरोबर एकत्र निवडणूक लढवू, अशी कोणतीही चर्चा नाही, असं नितीन सरदेसाई यांनी स्पष्ट केलं.

**काँग्रेसचे सचिन सावंत यांची प्रतिक्रिया...**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सचिन सावंत यांनीदेखील याबाबत भूमिका मांडली आहे. या निवडणुका स्थानिक मुद्द्यांवरती असल्याने आमचे जे स्थानिक नेते आहेत, किंवा जिल्हा काँग्रेस कमिटींना आदेश देण्यात आले आहेत की, आघाडी करायची की स्वतंत्र लढायचं याबाबतचा निर्णय तुम्ही घ्यावा. पण आघाडी करायची असेल तर इंडिया आघाडीच्या सदस्य पक्षांशीच आघाडी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. लवकरच केंद्रीय नेतृत्व मुंबईत स्वतंत्र लढावं किंवा आघाडी कोणत्या स्वरुपाची करावी याबाबतचा निर्णय जाहीर करेल अशी अपेक्षा आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे सचिन सावंत यांनी दिली आहे.

## मच्छिमारांना कर्जावर ४ टक्के व्याज सवलत

**अक्षराज : जे. के. पोळ**



**दि.०५, मुंबई :** राज्यातील मच्छिमार, मत्स्यकास्तकार, मत्स्यउत्पादकांसह किसान क्रेडिट कार्डधारक मत्स्यव्यावसायिकांना २ लाख रूपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या खेळत्या भांडवली कर्जावर चार टक्के व्याज परतावा सवलत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. निर्णयामुळे हजारो मच्छिमार कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. ताजे मासे उत्पादन, संवर्धन आणि साठवण व्यवस्थापनाला यामुळे बळकटी मिळणार आहे.

या योजनेचा लाभ मच्छिमार, मत्स्यकास्तकार, मत्स्यउत्पादक, मत्स्यव्यवस्थापन करणारे, मत्स्यबीज संवर्धक, मत्स्यबोटुकली संवर्धन करणारे तसेच पोस्ट हार्वेस्टिंग टप्प्यात वर्गीकरण, प्रतवारी, आवेष्ठन आणि साठवणूक करणाऱ्यांना मिळणार आहे. घेतलेले अल्पमुदतीचे खेळते भांडवली कर्ज हे उचल केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत परतफेड करावे लागणार आहे. व्याज परताव्याची प्रक्रिया सहकार विभाग व संबंधित बँकांच्या माध्यमातून केली जाणार आहे. शेतकऱ्यांना ज्या पद्धतीने पीककर्ज मिळते, त्याच धर्तीवर मच्छिमारांना हे खेळते भांडवली कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल. राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या योजनेत सहभागी राहतील.

या योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान उद्भवणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हास्तरावर सहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना समन्वय साधण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत 'सरपंच' ला राजकीय पक्षाचे चिन्ह द्या !

- विसापूर ग्रामपंचायतीने केला ठराव पारित
- राज्य निवडणूक आयोगाकडे करणार मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यात विसापूर ग्रामपंचायत सर्वात मोठी स्थानिक स्वराज्य संस्था आहे. मतदारांची संख्या ८ हजार १०७ इतकी आहे. या ग्रामपंचायतीची मुदत ५ फेब्रुवारी २०२६ रोजी संपत आहे. यामुळे आगामी ग्रामपंचायत निवडणूक दरम्यान सरपंच पदाची निवड मतदारांतून थेट होण्याची शक्यता आहे. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने सरपंच पदाच्या निवडीसाठी राजकीय पक्षाचे चिन्ह द्यावे, असा मासिक सभेत ठराव पारित केला आहे. असा ठराव करणारी विसापूर ग्रामपंचायत जिल्ह्यात पहिली असल्याची माहिती आहे. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडे मागणी करण्यात येणार असल्याची माहिती उपसरपंच अनेकश्वर मेश्राम यांनी दिली. विसापूर ग्रामपंचायतीच्या इतिहासात आगामी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक पहिल्यांदाच सरपंच पदाची निवड थेट मतदारांतून केली जाण्याची शक्यता आहे. येथील ग्रामपंचायत मध्ये आजतागायत १२ सरपंचानी गावाच्या विकासासाठी हातभार लावला आहे. येथील सदस्य संख्या १७ आहे. यापूर्वी येथील सदस्यांमधून सरपंच व उपसरपंच पदाची निवड केली जात होती. आता मात्र राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सरपंच थेट मतदारांतून निवडून येणार आहे. यामुळे सरपंच पदाच्या निवडणुकीत असणाऱ्यांना राजकीय पक्षाचे चिन्ह देण्यात यावे, म्हणून विसापूर ग्रामपंचायत सदस्यांनी ठराव पारित केला. स्थानिक स्वराज्य संस्था




असलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपंचायत, महानगरपालिकेच्या निवडणुकीत राजकीय पक्षांच्या चिन्हावर लढविल्या जात आहे. त्याच धर्तीवर ग्रामपंचायत सरपंच पदाच्या निवडीसाठी राजकीय पक्षाचे चिन्ह बहाल करण्यात यावे, असा प्रस्ताव सरपंच वर्षा कुळमेथे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मासिक सभेत उपसरपंच अनेकश्वर मेश्राम मांडला. याला एक सदस्य वगळता सर्वांनी प्रस्ताव मंजूर केला.

**विसापुरात पाचव्यांदा मिळणार महिलेला सरपंच पदाची संधी**

बल्लारपूर तालुक्यात विसापूर एकमेव १७ सदस्यांची मोठी ग्रामपंचायत आहे. ग्रामीण भागात सरपंच पदाला विशेष महत्व आहे. यामुळे अनेकांचा सरपंच होण्याकडे कल आहे. येथील आगामी सरपंच पद नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलेला आरक्षित झाले आहे. यामुळे ग्रामपंचायतीच्या इतिहासात पाचव्यांदा महिला सरपंच होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यापूर्वी येथील सरपंच पदी संध्या पेंदोर, सुभद्रा धुर्वे, रिता जिलटे व विद्यमान सरपंच वर्षा कुळमेथे यांनी गावाचा कारभार केला. पहिले सरपंच होण्याचा मान यादवराव येजूरवार यांना मिळाला आहे. त्यानंतर काशिनाथ ईटनकर यांनी १५ वर्षे, विठोबा गौरकार यांनी १० वर्षे,रामभाऊ टोंगे यांनी १० वर्षे, भारद्वाज जीवने, बंडू गिरडकर, ढीवरू सिडाम यांनी येथे सरपंच म्हणून कार्यभार पार पाडला आहे. पंढरीनाथ गिरडकर यांचा कार्यकाळ केवळ १२ दिवस आहे. आता मात्र पाचव्यांदा कोणत्या महिलेच्या गळ्यात सरपंच पदाची माळ पडते, यांकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## 'किल्लयांवरचं नमो सेंटर फोडणार' म्हणणाऱ्या राज ठाकरेंवर श्रीकांत शिंदेंचा पलटवार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, बुलडाणा :** आगामी निवडणुका लक्षात घेता, आता राज-उद्धव हे ठाकरे बंधू एकत्र लढतील अशी स्थिती नक्की मानली जात आहे. त्यामुळे आता ठाकरे बंधूंनी आपले राजकीय विरोधक पक्के करण्यास सुरुवात केली आहे, असे म्हणावे लागेल. मागच्या काही सभा आणि त्यामधली या दोन्ही भावांची भाषणं पाहिली तर त्यांनी भाजप आणि शिंदे गटावर तुटून पडायची भूमिका घेतल्याचे पाहायला मिळते आहे. त्यामुळे मुंबई, ठाणे महापालिका निवडणुकीत चांगलीच चुरस पाहायला मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पंचाहत्तरीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्लयांवर नमो टुरिझम सेंटर्स उभे करणार असल्याची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा केलेली आहे. त्यावरून मनसेप्रमुख राज ठाकरेंनी एकनाथ शिंदेना चांगलंच घेरलं आहे. त्यांनी नमो टुरिझम उभे केले की फोडून टाकणार असा थेट



इशारा दिला आहे. दरम्यान, यावरुन आता पहिल्यांदाच शिंदे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांनी राज ठाकरेंवर पलटवार केला आहे. हे लोक काहीही निर्माण करू शकत नाहीत त्यामुळे तोडफोडीची भाषा करतात अशी जोरदार टीका श्रीकांत शिंदे यांनी राज ठाकरेंवर केली आहे. विशेष म्हणजे राज यांच्यावर श्रीकांत शिंदे यांनी यावेळी पहिल्यांदाच अशी थेट टीका केली आहे.

राज्य सरकारच्या पर्यटन विभागाने किल्लयांवर नमो केंद्रांची उभारणी केली तरी ती मोदींच्या नावाने उभी करण्याला राज ठाकरेंनी विरोध केला आहे. त्यांनी हे केंद्र फोडून टाकण्याचा आदेश मनसैनिकांना दिला आहे. त्यावरुनच आता एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे यांनी राज यांच्यावर टीका केली आहे. ते आज बुलढाण्यात पत्रकारांशी बोलत होते.

ही टीका करताना श्रीकांत शिंदे म्हणाले राज ठाकरे नमो पर्यटन केंद्र फोडण्याचा इशारा देतात कारण, त्यांच्याकडून काहीही चांगलं झालेलं नाही. ही लोकं काही निर्माण करु शकत नसल्याने तोडाफोडीची भाषा करतात. एवढी आगपाखड करण्याची गरज काय? असं म्हणत श्रीकांत शिंदे यांनी राज ठाकरेंना टार्गेट केलं आहे.

ते पुढे म्हणाले की, गडकिल्लयांवर पर्यटकांना माहिती मिळण्यासाठी ते केंद्र सुरु करण्यात येणार आहेत. किल्लयांच्या किंवा मंदिरांच्या जीर्णोद्धारांच काम महायुती सरकारनेचं केलं. त्यामुळे नरेंद्र मोदींचं कौतुक करण्याऐवजी ते फोडण्याची भाषा करतात. मात्र कधी काळी यांनीही नरेंद्र मोदींचे कौतुक केले होते, असाही टोला श्रीकांत शिंदेंनी राज ठाकरेंना लगावला आहे.

## मिशन मोडवर दिव्यांगाचे 'युडीआयडी' कार्ड काढा...




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** जिल्ह्यात नोंदणीकृत दिव्यांगांची संख्या ८५७८ असून, त्यांच्या सक्षमीकरणासाठी शासन प्रशासन अनेक उपक्रम राबवित आहे. यात दिव्यांगांना 'युडीआयडी' कार्ड (स्वावलंबन कार्ड) वितरीत करणे, याचा समावेश आहे. त्यामुळे मिशन मोडवर दिव्यांगांना' युडीआयडी' कार्डचे वाटप करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात दिव्यांग सक्षमीकरणाबाबत आढावा घेताना ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, जिल्हा सक्षमीकरण अधिकारी धनंजय साळवे, वैद्यकीय अधिकारी डॉ.बंडू रामटेके, दिव्यांग प्रतिनिधी निलेश पाझारे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान' उपक्रमांतर्गत दिव्यांगांचे 'युडीआयडी' कार्ड मोठ्या प्रमाणात काढण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत, असे सांगून जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, यासाठी तालुकानिहाय विशेष शिबिराचे आयोजन करावे. सार्वजनिक बांधकाम विभागाने दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे काम अतिशय दर्जेदार आणि गतीने करावे. अत्याधुनिक उपकरणांची तेथे उपलब्धता असावी. या केंद्राकरीता मनुष्यबळ आणि इतर साधनसामुग्री बाबत आत्ताच नियोजन करा, अशाही सूचना त्यांनी दिल्या. सादरीकरण करताना दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी धनंजय साळवे यांनी जिल्ह्यात आत्तापर्यंत २७२७ दिव्यांग बांधवांचे ' युडीआयडी' कार्ड काढण्यात आल्याचे सांगितले.

यावेळी इंडियन रेडक्रॉस सोसायटीद्वारा संचालित दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या पदभरतीस मान्यता देणे, या केंद्राचे तात्पुरत्या स्वरुपात कामकाज डीईआयसी येथे सुरु करणे, ' युडीआयडी' कार्ड मिळण्याच्या दृष्टीने नियोजनबध्द कार्यक्रम आखून त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे, दिव्यांग व्यक्तीसाठी दृष्टी पोर्टल, चंद्रपूर जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणे, संकेतस्थळे, वाहतुक व इतर अनुषंगिक सोयीसुविधा दिव्यांगांसाठी सुगम्य करणे आदींचा आढावा घेण्यात आला.

# संपादकीय

## शाळा तुटली, पाटी फुटली!

बी. डी. भालेकर नाशिकमधील रस्त्यावरचा सामान्य फुटाणेविक्रेता. साधी अक्षरओळखही नसलेल्या या माणसाचे कर्तृत्व मात्र असामान्य ठरले. १९६०च्या दशकात चणेफुटाणे विकून त्यांनी पै पै जमा केली अन् ते पैसे शाळा उभारण्यासाठी देणगी म्हणून दिले. जेथे ते हातगाडी लावत, तेथे शाळेची इमारत उभी राहिली. शिक्षणाची गंगा रंजल्या गांजल्यांपर्यंत पोहोचवणारे भालेकर यांच्या कार्याचे धुरिणांनीही स्मरण ठेवले. या शाळेला त्यांचे नाव देण्यात आले.

नाशिकच्या शालिमार परिसरातील दुमजली बी. डी. भालेकर शाळा हा आजही अनेकांसाठी हळवा कोपरा. नाशिकच्या शैक्षणिक वाटचालीतील प्रारंभिक टप्पा ठरलेल्या या शाळेच्या भूखंडावर काही मंडळींची वक्रदृष्टी पडली. महापालिका शाळेच्या इमारतीवर हातोडा चालवणार आहे. त्या जागेवर दुसरी शाळा वा शिक्षकांसाठी प्रशिक्षण केंद्र नव्हे, तर 'विशामगृह' उभारले जाणार आहे.

कोणताही राजकीय वा शैक्षणिक वारसा नसताना, भालेकर यांनी सहा दशकांपूर्वी विलक्षण तळमळीने शाळा उभी केली. त्या काळी बरी परिस्थिती असलेल्या मुलांसाठी पेठे हायस्कूल, रुंग्टा विद्यालय, शासकीय कन्या विद्यालय या शाळा होत्या. अन्नपाण्याची भ्रांत असणारे मजूर, झोपडपट्टी रहिवासी, देहविक्रय करणाऱ्या महिलांची मुले मात्र भालेकर शाळेत शिकली अन् मोठी झाली. गेल्या काही वर्षांत दुर्लक्ष, उदासीनता वा कारस्थानातून अनेक मराठी शाळांचा गळा घोटण्यात आला. आता 'भालेकर'बाबतही त्याची पुनरावृत्ती होते आहे.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या शाळेच्या जागेवर डोळा ठेवून महापालिकेने शाळेच्या गळचेपीला सुरुवात केली. आधी विद्यार्थ्यांची पळवापळवी झाली. मग विद्यार्थिसंख्या घटल्याचे दाखवून शाळाच बंद पाडण्यात आली. ही शाळा चालवण्याची तयारी दर्शवणाऱ्या संस्थांनाही वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या. शाळेची इमारत मोडकळीस आल्याचे सांगून आती ती जमीनदोस्त केली जाणार आहे. काही वर्षांपूर्वीही व्यापारी संकुल, सरकारी कार्यालये थाटण्याचे कारस्थान घडले होते. परंतु, तेव्हा सजग मंडळींनी ते हाणून पाडले. आता पुन्हा डाव रचला गेला आहे. खुद्द शिक्षणमंत्र्यांच्या जिल्ह्यात, त्यांच्या पक्ष कार्यालयापासून हाकेच्या अंतरावर असलेली एक मराठी शाळा इतिहासजमा होत असताना, त्यावर कोणी अवाक्षरही उच्चारण्यास तयार नाही. एकीकडे मराठी शाळांचा दर्जा टिकवा, अशी ओरड करायची आणि दुसरीकडे आहे त्या शाळांना टाळे लावण्याचा करंटेपणा करायचा. असले दुटप्पी वर्तन अशोभनीय आहे. महाराष्ट्र, मायमराठी आणि शैक्षणिक चळवळीला ते परवडणारे नाही.

भालेकर शाळा हे एक उदाहरण. राज्यातील दोन-अडीच हजार मराठी शाळांची परिस्थिती कमी-अधिक फरकाने अशीच. जराजर्जर इमारती, गळक्या खोल्या, खडू-बाकड्यांसारख्या प्राथमिक सामग्रीपासून ते शिक्षकांपर्यंत अनेक बाबींचा अभाव असे चित्र सर्वदूर दिसते. या संस्थांच्या जागा घशात घालण्याचे कारस्थान होते आहे. मराठीजन मात्र 'आम्हाला काय त्याचे' या भूमिकेतून बाहेर पडण्यास तयार नाहीत. सारे लोकप्रतिनिधी, सत्ताधारी भाजपचे आमदारही मूग गिळून गप्प आहेत. मराठी भाषा, अस्मितेच्या नावाने गळे काढणारे राजकीय पक्ष, सामाजिक कार्यकर्त्यांनाही जाग आलेली नाही.

गावांची जडणघडण, इतिहास, संस्कृती-परंपरेच्या साक्षीदार असलेल्या अशा असंख्य इमारती हताशपणे अखेरच्या घटका मोजत आहेत. 'आम्हाला वाचवा' म्हणून आर्त साद घालत आहेत. त्यांना प्रतिसाद देत धावून जायला हवे. तसे घडले तरच मुंबईतील मंत्रालयातील मजल्यापर्यंत आवाज पोहोचू शकेल. कोणास ठाऊक, नैतिकता व अस्मिता उरलेल्या तिथल्या काही जणांना जाग येऊ शकेल अन् बंद पडणाऱ्या काही शाळा तगू शकतील. भालेकरप्रकरणी काही सामान्य नाशिककर, माजी विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्ते पुढे सरसावले आहेतच. त्यांच्या लढ्याला पाठिंबा देऊन सक्षम लोकचळवळ उभी करायला हवी; अन्यथा अशा साध्या पण गरिबांना शहाणे करण्याची ताकद असलेल्या शाळा धारातीर्थी पडून टोलेजंग विश्राम गृहांच्या इमारतींचे इमले चढतच राहतील!

# महिला क्रिकेट मधील विश्वविजेता..!!

## 'अमोल मुझुमदार क्रांती' घडवणारे प्रशिक्षक....






.'म्हारी छोरियां छोरों से कम हैं के'.आमिर खानच्या 'दंगल' चित्रपटातील हा बहुचर्चित संवाद खरा ठरला तो गेल्या रविवारी २ नोव्हेंबरला, रविवारी रात्री. महिला एकदिवसीय क्रिकेट विश्वचषकात भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेच्या महिला क्रिकेट संघाचा अंतिम सामन्यात पराभव करत १३ व्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषकावर पहिल्यांदा नाव कोरले. या मोठ्या आणि आशादायी विजयाचा जागर क्रिकेट चाहत्यांनी रात्रभर साजरा केला. ढोल ताशांच्या गजरात अनेक जणांनी विजयी जल्लोष केला. याशिवाय स्त्री-पुरुष समानतेमध्ये भारत तितकासा मागे नसला तरी देशाला समान पातळीवर आणून प्रगती करण्याच्या प्रक्रियेत ही एक महत्त्वाची घटना घडली. वूमन क्रिकेट असोसिएशनच्या स्थापनेला पुढील वर्षी १०० वर्षे पूर्ण होतील. १९२६ साली या असोसिएशनच्या स्थापनेनंतर १९३३-३४ या वर्षामध्ये ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात पहिली कसोटी मालिका खेळवण्यात आली. भारतीय महिला क्रिकेट असोसिएशनची स्थापना १९७३ मध्ये उशिराच झाली. भारतीय महिला संघाने १९७६ मध्ये त्यांचा पहिला कसोटी सामना वेस्ट इंडीजविरुद्ध खेळला. पाटणा येथील मोईन-उल-हक स्टेडियमवर, शांता रंगास्वामी यांच्या नेतृत्वाखाली नोव्हेंबर १९७६ मध्ये वेस्ट इंडीजविरुद्ध भारतीय महिला संघाने पहिला कसोटी विजय नोंदविला.

भारतीय महिला क्रिकेट असोसिएशन ही महिला क्रिकेटची प्रशासकीय संस्था, आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेट परिषदेशी संलग्न होती. महिला क्रिकेट विकसित करण्याच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या पुढाकाराचा एक भाग म्हणून, भारतीय महिला क्रिकेट असोसिएशनचे २००६-०७ मध्ये भारतीय क्रिकेट नियामक मंडळामध्ये विलीनीकरण करण्यात आले. त्यानंतर आतापर्यंत भारतीय महिला संघाने अनेक चढउतार पाहिले. अनेक विजय थोडक्यात हुकल्याचे पाहिले आणि अखेर २ नोव्हेंबरला क्रिकेट विश्वचषकाला गवसणी घातलीच. महिला क्रिकेट विश्वचषकाला १९७३ साली सुरुवात झाली. १९८८ सालपर्यंतच्या महिला एकदिवसीय विश्वचषकात ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड संघांची 'दीदीगिरी' होती. विजेते आणि उपविजेते म्हणून या दोन संघांच्याच पोरींचा दरारा होता. बाकी कोणाला एन्ट्री मिळेल याची शक्यता कमीच. परंतु, त्यानंतर १९९३, १९९७ आणि २००९ साली न्यूझीलंड क्रिकेट संघाने उपविजेतेपदापर्यंत मजल मारली. तर २००० साली न्यूझीलंड क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकून ही दीदीगिरी मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. २००५ आणि २०१७ साली भारतीय महिला क्रिकेट संघ अंतिम फेरीपर्यंत पोहोचला. तर २०१३ साली वेस्ट इंडिज संघाने आणि आता २०२५ साली दक्षिण आफ्रिका उपविजेती ठरली. हा सर्व डाटा समोर मांडण्याचा प्रपंच याचसाठी की इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाचे वर्चस्व मोडीत काढत इतर महिला क्रिकेट संघ देखील गेल्या काही वर्षात उभे राहिले.

ऑस्ट्रेलिया संघाचा वचक इतका की एकूण १३ स्पर्धांमध्ये एकट्या ऑस्ट्रेलिया संघाने ७ वेळा, इंग्लंडने ४ वेळा तर भारत आणि न्यूझीलंडला एकदा विश्वचषक



कव्हर स्टोरी

- शिवाजी विठ्ठल चौगुले.
कागल-कोल्हापूर..

जिंकण्यात आतापर्यंत यश आले आहे. २०२५ सालचे हे विश्वचषक विजेतेपद मिळवताना भारतीय संघाने अनेक अडथळे पार केले. आधी आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड संघांकडून सलग तीन पराभव झाल्यानंतर भारतीय संघ कमबॅक करेल, अशी आशा कमीच होती. परंतु, भारतीय महिला संघाने फिनिक्स भरारी घेऊन सेमी फायनलमध्ये बलाढ्य ऑस्ट्रेलिया संघाचा ५ विकेट्स राखून पराभव करून पुरुष क्रिकेटमध्ये मने गुंतलेल्या क्रिकेट रसिकांना महिला क्रिकेटकडे लक्ष देण्यास भाग पाडलं. तसेच अंतिम फेरीत संपूर्ण विश्वचषक स्पर्धेत फॉर्मात असलेल्या आफ्रिका संघाला पराभूत करून पहिल्यांदा विश्वचषकाला गवसणी घातली. या विश्वचषक विजयानंतर २०१७ साली केवळ ९ धावांनी विश्वचषक हुकलेल्या भारतीय क्रिकेट चाहत्यांनी एकच जल्लोष केला. कर्णधार हरमनप्रित कौर, मानधना, शेफाली वर्मा, दिप्ती शर्मा, रुचा घोष, जेमिमा, रेणुका सिंग, क्रांती गौड, अमनज्योत कौर, राधा यादव, नल्लापुरेड्डी चराणी साऱ्यांनीच उत्कृष्ट कामगिरी करत भारतीय क्रिकेट चाहत्यांना हा आनंद दिला. याशिवाय या यशात संघाचे मुख्य प्रशिक्षक आणि माजी क्रिकेटपटू अमोल मुजुमदार, सपोर्ट स्टाफ यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या प्रशिक्षणाखाली भारतीय मुली जिद्दीने लढल्या. भारतीय महिला संघाने मिळवलेला हा विजय. मुंबईचा अमोल मुझुमदार क्रांती' घडवणारे प्रशिक्षक या यशामागे आणखी एक व्यक्ती खंबीरपणे उभी होती, ती म्हणजे मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार. मुझुमदार हे 'मुंबईचे उत्कृष्ट फलंदाज' म्हणून ओळखले जातात, ज्यांनी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ११,००० हून अधिक धावा केल्या, पण त्यांना भारताकडून आंतराष्ट्रीय सामना खेळण्याची संधी कधीच मिळाली नाही. याच कारणामुळे, त्यांच्या नियुक्तीवर काही जणांनी शंका उपस्थित केली होती. पण मुझुमदार यांनी आपल्या कामातून एक 'शांत क्रांती' घडवली. त्यांची शांत स्वभाव, संयमी नेतृत्वशैली आणि खेळाडूंमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची पद्धत संघासाठी अत्यंत मोलाची ठरली. विश्वचषकाच्या साखळी फेरीत ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडकडून पराभव पत्करावा लागल्यानंतरही त्यांनी ड्रेसिंग रूममधील वातावरण शांत आणि सकारात्मक ठेवले. मुझुमदार यांच्या यशाने भारतीय क्रिकेटमधील एका जुन्या समीकरणाला छेद दिलाः यशस्वी खेळाडूच यशस्वी प्रशिक्षक होऊ शकतो. त्यांनी दाखवून दिले की, खेळाबद्दलची सखोल समज, व्यवस्थापन कौशल्य आणि खेळाडूंना प्रेरित करण्याची क्षमता ही कोणत्याही आंतरराष्ट्रीय कॅपपेक्षा अधिक मोलाची आहे. याच शांत आणि सकारात्मक वातावरणाने खेळाडूंना त्यांच्या क्षमतेच्या शिखरावर पोहोचण्यासाठी एक सुरक्षित व्यासपीठ दिले भारतीय महिला क्रिकेटसाठी महत्त्वाचा आणि ऊर्जा देणारा निश्चितच आहे, शिवाय देशात प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक स्त्रीसाठी तितकाच महत्त्वाचा आहे. इतकी वर्षे पुरुष संघाच्या तुलनेत महिला क्रिकेटला मोठे फॅन वलय मिळाले नव्हते. शिवाय त्यातून होणारी आर्थिक प्रगती पुरुष संघाएवढी निश्चितच नव्हती. पण गेल्या काही वर्षांत आयपीएलच्या धर्तीवर वुमन प्रिमियर लीगसारख्या स्पर्धा सुरू झाल्यापासून महिला क्रिकेटचीदेखील आर्थिक प्रगती होत आहे. आता तर क्रिकेटचा विश्वचषक जिंकल्यानंतर महिला क्रिकेटला सोन्याचे दिवस येणार आहेत. निरनिराळ्या जाहिराती आणि स्पर्धांमध्ये आगामी काळात आधीपेक्षा जास्त महिला खेळाडूंना संधी उपलब्ध होणार आहेत. या मोठ्या यशामुळे देशातील पालकांचा महिला क्रिकेटकडे बघण्याचा दृष्टिकोन अधिकच सकारात्मक होताना दिसेल. त्यामुळे आगामी काळात अनेक दर्जेदार खेळाडू भारतीय महिला संघात खेळताना दिसतील. तसेच त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीत त्यांना पुरुष क्रिकेटपटूंसारखे आर्थिक यश आणि प्रसिध्दी मिळेल. आता हेच सोन्याचे दिवस महिलांशी संबंधित इतर खेळांमध्ये आणि क्षेत्रांमध्ये यावेत हीच आशा आहे.

## टक्का...

यशात केवळ आनंद
अपयशा अनंतशिका
अवघड भला विजय
अधिक सहज जिंका

असो दृष्टी सिमापार
विजयसिक्सर ठोका
संधीअसे पार फसवी
ऐनक्षणी देईल धोका

फायदाउठवे चाणाक्ष
मिळता सुवर्ण मोका
अडचणीच्याडोंगरात
कुणीन आपलेआका

आपलेचं पाडे आडवे
दमआणतात रे नाका
टोल वसूली करायला
मात्र थाटला से नाका

पुढे खिदळत्यायशांस
मागून मारतात हाका
हिसकावू घ्याया श्रेय
सहज न सोडती हेका

सर्वोच्च उंचीवर जेंव्हा
रे पुरेसा एकचं धक्का
सतर्क नसाल जरा ही
कपाळमोक्ष तो पक्का

ओळखला जाई कुणी
महत्वाचा असेशिक्का
शून्यवत वाटते सगळे
अपूर्ण शंभर ही टक्का

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# हॅप्पी बर्थडे किंग कोहली !

**क्रिकेटचा किंग, चेस मास्टर, विक्रमवीर, रन मशिन यासारखी अनेक बिरुदावली ज्याच्या नावापुढे लागली आहेत तो भारताचाच नव्हे तर जगातील सर्वोत्तम फलंदाज, भारताचा कोहिनूर विराट कोहलीचा काल म्हणजे ५ नोव्हेंबर रोजी ३७ वा वाढदिवस होता. किंग कोहलीला ३७ व्या वाढदिवसाच्या सर्वप्रथम हार्दिक शुभेच्छा!**



क्रिकेट या खेळाने जगाला अनेक महान खेळाडू दिले. सचिन तेंडुलकर हा त्यापैकीच एक महान खेळाडू. क्रिकेटमधील दैदिप्यमान कामगिरीने तो क्रिकेटचा देव बनला. जवळपास दोन तप त्याने क्रिकेटवर अधिराज्य गाजवले. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले. २०१३ साली त्याने निवृत्ती स्वीकारली. निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने विक्रमांचे एव्हरेस्ट गाठले. तो निवृत्त झाल्यावर त्याच्या इतक्या क्षमतेचा खेळाडू पुन्हा भारताला मिळेल का ? असाच प्रश्न संपूर्ण क्रिकेट विश्वाला पडला होता. ज्या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नव्हते त्या प्रश्नाचे उत्तर खुद्द सचिनकडे होते. सचिनला जेंव्हा प्रश्न विचारण्यात आले की तुझा विश्वविक्रम कोणता खेळाडू मोडेल असे तुला वाटते तेंव्हा त्याने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले 'विराट कोहली' सर्वांना त्यावेळी ही अतिशोक्ती वाटली पण सचिनने विराटची गुणवत्ता हेरली होती. निवृत्त होण्यापूर्वी चार पाच वर्ष तो आणि विराट एकत्र खेळले होते त्यामुळे विराट कोणत्या क्षमतेचा खेळाडू आहे आणि तो काय करू शकतो हे सचिनला माहीत होते त्यामुळेच सचिनने आपला वारसदार म्हणून विराटची निवड केली होती. विराटने सचिनचे म्हणणे अवघ्या दहा वर्षात खरे करून दाखवले आणि सचिनचा विश्वास सार्थ ठरविला. आज विराट देखील सचिन प्रमाणे विक्रमांचे इमले चढत आहेत इतकेच नाही तर सचिनचे अनेक विक्रम त्याच्या दृष्टिक्षेपात आले आहेत. सचिनच्या एकदिवसीय शतकांचा विक्रम त्याने नुकताच मोडला असून त्याच्या नावावर आता ५१ एकदिवसीय शतक आहेत. त्याने त्याच्या कारकीर्दीत एकूण ८२ शतक झळकावले आहेत. एकदिवसीय क्रिकेट प्रमाणेच विराट सचिनच्या एकूण १०० शतकांचा विक्रमही लवकरच आपल्या नावे करेल असा विश्वास क्रिकेटप्रेमींना होता. आज त्याच्या नावे ८२ शतके आहेत. कसोटीत त्याने ३० शतके झळकावली आहेत तर एकदिवसीय सामन्यात ५१ शतके त्याच्या नावावर आहेत.

टी २० सामन्यातही त्याचे एक शतक आहे. आज तो ३७ वर्षाचा झाला आहे. त्याचा फिटनेस जबरदस्त आहे. वीस वर्षाचा खेळाडू देखील त्याच्यासमोर फिका पडेल असा त्याचा फिटनेस आहे त्यामुळे तो आणखी दोन - तीन वर्ष सहज खेळू शकतो मात्र त्याने कसोटी आणि टी २० प्रकारातून निवृत्ती घेतली आहे तो आता फक्त एकदिवसीय क्रिकेट खेळत असल्याने सचिनच्या १०० शतकांचा विक्रम विराटकडून मोडण्याची शक्यता धूसर झाली असली तरी तोच सचिनचा खरा वारस आहे हे देखील त्याने सिद्ध केले आहे. विराटच्या जवळपास जगातील दुसरा कोणताच खेळाडू नाही. विराट केवळ विक्रमवीर नाही तर तो आज जगातला महान फलंदाज बनला आहे. उत्तम खेळाडू ते महान खेळाडू बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास अचंबित करणारा आहे. अवघ्या दहा बारा वर्षात तो आज जगातला महान खेळाडू बनला आहे. त्याने धावांची टांकसाळ उभारली आहे. प्रत्येक सामन्यात तो खोऱ्याने धावा काढत आहे. त्याची बॅट म्हणजे जणू धावांची मशिन, त्याच्या बॅट मधून धावांची बरसात होत आहे म्हणूनच आकाश चोप्रा त्याला विराट द रन मशिन कोहली असे म्हणतो. त्याने काढलेल्या शतकांपैकी ९५ टक्के शतके भारताच्या विजयास कारणीभूत ठरली आहेत यावरून त्याच्या शतकांचे मोल लक्षात येते.

धावांचा पाठलाग करताना तर त्याने सर्वाधिक शतके झळकावली आहेत म्हणूनच त्याला चेस मास्टर असेही म्हंटले जाते. विराटने शतक झळकावले म्हणजे भारत विजयी झाला असेच समीकरण बनले आहे. केवळ शतकच नव्हे तर त्याच्या अनेक छोट्या मोठ्या खेळी भारताला विजय मिळवून देणाऱ्या ठरल्या. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले आहेत. ऑस्ट्रेलियात झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेतील पाकिस्तान विरुद्धचा सामना आठवा. आपण तो सामना केवळ विराटमुळे जिंकू शकलो. हातातून गेलेला सामना त्याने ज्याप्रकारे खेचून आणला ते पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. तशी खेळी फक्त आणि फक्त विराटच खेळू शकतो. मागील वर्षी भारताने जिंकलेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याने ७० धावा काढून भारताला विश्व विजयी केले होते. या दोन खेळी फक्त एक उदाहरण आहे. तशा प्रकारच्या अनेक खेळी करून त्याने भारताला अनेक अशक्यप्राय विजय मिळवून दिले आहेत. कठीण समय येता विराट कामी येई.... असे उगीच क्रिकेटप्रेमी म्हणत नाहीत.

टी २० विश्वचषकात भारताला विजय मिळवून देऊन त्याने क्रिकेट प्रेमिंचे एक स्वप्न पूर्ण केले आहे आता २०२७ मध्ये होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत त्याने भारताला अजिंक्यपद मिळवून द्यावे अशी क्रिकेटप्रेमींची त्याच्याकडून अपेक्षा आहे. सध्या तो त्याच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये नाहीये मात्र तो असा खेळाडू आहे जो कधीही फॉर्मात येऊ शकतो. तो लवकरच सर्वोत्तम फॉर्ममध्ये परतेल आणि भारताला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचे अजिंक्यपद मिळवून देईल यात शंका नाही.

**विराटला पुन्हा एकदा**
**वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!**
**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी मुंबई उपनगर पूर्व - पश्चिम संघाची निवड





**अक्षराज : संदीप येवले**

**दि.०५, मुंबई :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने पुणे जिल्हा कबड्डी असो.च्या विद्यमाने होणाऱ्या ३६व्या किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी मुंबई उपनगर संघाची निवड करण्यात आली आहे.मुंबई उपनगर पूर्व विभाग किशोरी गटाच्या कर्णधारपदी सई ताम्हाणेकर,किशोर गटाच्या कर्णधारपदी आर्यन भोजने यांची निवड करण्यात आली आहे.बोपखेले,पुणे येथे दिनांक ०५ नोव्हेंबर २०२५ पासून या स्पर्धेला प्रारंभ होईल. प्रथम किशोरी(मुलींचे) गटाचे सामने होतील.

मुंबई उपनगर (किशोरी गट) पूर्व विभाग मुली - सई ताम्हाणेकर(कर्णधार),सायली सकपाळ(उप कर्णधार), आरुषी यादव, सानिका ढवळे, रिया चांदोरकर,पल्लवी जाधव, खुशी प्रजापती, श्रीप्रिया रामन, हिरल टांक, स्फूर्ती शेंडगे, मनस्विनी पवार, उन्नती शेलटकर, प्रियांशी बनिया,

निहारिका मर्चंट

संघ प्रशिक्षक :- रमेश जावळे

संघ व्यवस्थापक :- चित्रा संधू

मुंबई उपनगर (किशोर गट) पूर्व विभाग मुले -

आर्यन भोजने(कर्णधार), साहिल यादव, हर्ष सिंग, विहान सिंग, उद्धव सकपाळ, चेतन सणस, स्मित गुदगे, शिवराज भागत, प्रीत सनस, चैतन्य चव्हाण, यश पाटील, सार्थक काळे, राज गुप्ता, विनायक राऊत

संघप्रशिक्षक - पुनीत पुजारी

संघ व्यवस्थापक - प्रभात पेडामकर

## सबर्बन मुंबई कॅडेट व सिनिअर जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धांचे आयोजन

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.०५, मुंबई :** तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई या अधिकृत संघटनेशी संलग्न असलेल्या तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई या संघटनेची अधिकृत स्पर्धा कै.विनायक गायकवाड सर संघटनेचे अध्यक्ष यांच्या स्मरणार्थ २४वी कॅडेट व सिनिअर जिल्हास्तरीय तायक्वॉंदो स्पर्धा व १०वी कॅडेट व सिनिअर पुमसे स्पर्धा सोमवार, दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी सेंट अँथनी हायस्कूल, खैरानी रोड, साकीनाका येथे आयोजित करण्यात येणार आहे.

सदर स्पर्धा या तायक्वॉंदो फेडरेशन ऑफ इंडिया व तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई यांच्या नियमाप्रमाणे होतील. या स्पर्धेत सबर्बन मुंबई जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घेण्यात यावा. या स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते खेळाडू हे जळगाव येथे होणाऱ्या कॅडेट व सिनिअर राज्यस्तरीय तायक्वॉंदो स्पर्धेत सबर्बन मुंबई चे प्रतिनिधित्व करणार आहे. अधिक माहिती साठी संदिप चव्हाण(सचिव) ८१६९६५६१८८, कल्पेश गोलांबडे (खजिनदार) ९५९४५९४४५५ यांच्याशी संपर्क करावा. तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबईचे नव निर्वाचित अध्यक्ष संदिप येवले यांनी जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घेण्यात यावा असे सर्वांना आव्हान करण्यात आले आहे.

## कल्याणमध्ये अस्मिता खेलो इंडिया सायकलिंग लीगचे भव्य आयोजन



**अक्षराज : दिलीप अहिनवे**

**दि.०५, कल्याण (ठाणे) :** भारतीय खेळ प्राधिकरण आयोजित, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया व सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकार्याने व ठाणे जिल्हा सायकलिंग असोसिएशन आयोजित अस्मिता खेलो इंडिया सायकलिंग लीगचे यशस्वी आयोजन नुकतेच कल्याण येथे करण्यात आले होते. स्पर्धांमध्ये १०० पेक्षा अधिक महिला सायकलपटूंनी आपला सहभाग नोंदवला.

स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे निरीक्षक सुदाम रोकडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ठाणे जिल्हा सायकलिंग असोसिएशनचे सचिव डॉ. यज्ञेश्वर बागराव यांनी या स्पर्धांचे आयोजन केले होते. स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय जिमनास्ट ओमकार शिंदे, अभिजीत शिंदे (शिवछत्रपती पुरस्कार विजेते) व महिला आंतरराष्ट्रीय खेळाडू रुपाली रेपाळे ( शिवछत्रपती पुरस्कार विजेती), क्रीडा अधिकारी सिद्धार्थ वाघमारे, कल्याण डोंबिवली महापालिका क्रीडा पर्यवेक्षक प्रवीण कांबळे व उपमुख्याध्यापक प्रमोद पारसी हे उपस्थित होते. सिनिअर, ज्युनिअर व सुबज्युनिअर महिलांच्या तीन गटांमध्ये अनुक्रमे २०, १० व ५ कि. मी. अंतराच्या घेण्यात आल्या.

**स्पर्धांचा निकाल पुढील प्रमाणे :-**

**सिनियर महिला (२० कि. मी.) :-** १) केनीस डीमॅलो (५२.१२.७६८) २) नयना अहरकर (५७.०३.११२) ३) हर्षल सरोदे (५९.२५.९६२)

**ज्युनिअर महिला (१० कि. मी.) :-** १) एवना गिगूळ (२६.१५.९६५) २) गार्गी पाटील (२९.०१.५६२) ३) उत्कर्षा पारसी (३०.१२.१०९)

**सुबज्युनिअर महिला (५ कि. मी.) :-** १) स्वरा मिठारी (२६.१५.९६५) २) श्रीनीथी कुमार (२९.०१.४६२) ३) बुरशाला फातिमा शेख (३०.१२.१०९)

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी चिंतामण पाटील, राकेश ठाकरे, अक्षय टेंभे, शुभम मोहपे, कृष्णा माळी, विजय सिंग, गजानन वाघ, स्वामिनाथन अय्यर, नीता बोरसे व हर्षल सरोदे यांनी मेहनत घेतली.

# चंद्रपूर कॅन्सर हॉस्पिटलला 'पद्मविभूषण स्व.रतन टाटा' यांचे नाव द्या

## खा.धानोरकर यांची मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** महाराष्ट्र शासन आणि टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्रपूर येथे मध्य भारतातील सर्वात मोठे कर्करोग निदान आणि उपचार रुग्णालय उभारले जात आहे.

या मानवतावादी आणि महत्वपूर्ण प्रकल्पात उद्योगपती आणि थोर दानशूर व्यक्तीमत्व पद्मविभूषण स्व.रतन टाटा यांचे अमूल्य योगदान आहे. त्यामुळे या अत्याधुनिक रुग्णालयाला 'पद्मविभूषण स्व. रतन टाटा कॅन्सर रुग्णालय' असे नाव देण्यात यावे,



अशी मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे. स्व.रतन टाटा यांनी चंद्रपूरसारख्या दुर्गम भागात एवढे मोठे आणि अद्यावत रुग्णालय उभे करण्यासाठी पुढाकार घेतला. ज्यामुळे विदर्भासह मध्य भारतातील लाखो गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. खा.प्रतिभा धानोरकर यांनी पत्रात नमूद केले की, रतन टाटा हे चंद्रपूरच्या माता महाकालीच्या पावन भूमीवर येऊन गेले आहेत. त्यामुळे चंद्रपूरकरांसाठी हा प्रकल्प अधिक महत्वपूर्ण ठरतो.

रतन टाटा हे केवळ मोठे उद्यागपती नाहीत, तर ते माणूसकी आणि नि:स्वार्थ समाजसेवेचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. त्यांनी चंद्रपूरला दिलेले हे रुग्णालय विदर्भासाठी एक वरदान आहे. त्यांच्या या महान योगदानाचा यथोचित गौरव करण्यासाठी या रुग्णालयाला त्यांचे नाव देणे ही कृतज्ञता व्यक्त करण्याची योग्य पध्दत ठरेल.

स्व.रतन टाटा यांच्या नावाने हे रुग्णालय ओळखले गेल्यास ते त्यांच्या समाजसेवेच्या विचारांना कायम प्रेरणा देत राहील आणि इतरांनाही सामाजिक बांधिलकीची जाणीव करुन देईल, असे भावनिक आवाहनही खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केले आहे.

# महाबळेश्वरमध्ये भारतीय महिला संघाच्या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०५, महाबळेश्वर (सातारा) :** सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर येथे दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी भारताच्या महिला क्रिकेट संघाने पहिला आयसीसी महिला विश्वचषक जिंकून इतिहास रचला आहे. नवी मुंबईतील डी.वाय.पाटील स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव केला.

या ऐतिहासिक विजयामुळे संपूर्ण देशभरात जल्लोष सुरु असून इनरव्हील क्लब ऑफ महाबळेश्वरच्यावतीने अध्यक्षा वर्षा संतोष पार्टे यांच्या संकल्पनेतून म हाबळेश्वर शहरात भव्य रॅली काढून विजयाच्या धून वाजवून विजयोत्सव साजरा करण्यात आला. येथील



नेताजी सुभाषचंद्र बोस चौकामधून रॅलीला प्रारंभ झाला ''भारत माता की जय'' नरी शक्तीचा विजय असो ''हिप हिप हुर्रे'' अश्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता ही रॅली मुख्य बाजारपेठे मार्गे छ शिवाजी महाराज चौक मार्गे मस्जित रास्ता ते पुन्हा नेताजी सुभाषचंद्र बोस चौकामध्ये पोहचली.

या रॅलीमध्ये इनरव्हील क्लब सदस्यांसह शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी इनरव्हील क्लब अध्यक्षा वर्षा संतोष पार्टे, मुक्ता कोमटी, सपना अरोरा, राधा मुक्कावार, अदिती भांगडिया, नेहा साळवी, गीत नागपाल, अश्विनी कोमटी, भक्ती जाधव,गायत्री जाधव, लक्ष्मी यरलगड्डा, वैशाली चौरसिया पुणे क्लब आयपीपी स्वाती अय्यर आदी सदस्यांसह माजी नगरसेविका स्वाती भांगडिया,शोभा महाबळेश्वरवाला, उषाताई ओंबळे, पार्वती भांगडिया यांच्यासह एमईएस शाळा, गिरिस्थान प्रशालेचे विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोयना धरणग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करा

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांना दिले निवेदन

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०५, पाटण (सातारा) :** कोयना धरणग्रस्त, अभयारण्यग्रस्त जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी होत असलेल्या विलंबाम ुळे महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल आचार्य



देवव्रत यांची कोयना धरणग्रस्तांनी भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन दिले. यावेळी कोयना धरणग्रस्त अभयारण्यग्रस्त संग्राम संघटनेचे अध्यक्ष चैतन्य दळवी, महेश शेलार, सचिन कदम, विनायक शेलार, पांडुरंग गोरे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. ७० वर्षापासून प्रलंबित असलेला कोयना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न व गेली ४० वर्षापासून प्रलंबित असलेला कोयना अभयारण्यग्रस्तांचा पुनर्रचनाचा प्रश्न अजूनही जैसे थे आहे. कोयना धरणग्रस्तांच्या तिसऱ्या आणि चौथ्या पिढीने चालू केलेला लढा अंतिम टप्प्यात आला असताना मंत्रालय स्तरावरील काही अधिकाऱ्यांच्या आडमुठे धोरणामुळे कोयना धरणग्रस्तांना जमीन मिळण्यात होणारा विलंब आणि अनावश्यक कागदपत्रांची केली जाणारी मागणी यामुळे कोयना धरणग्रस्तांचे पुनर्वसन लांबत चालले आहेत. चार पिढ्या गेल्या तरी अजूनही धरणग्रस्तांचे प्रश्न सुटत नाहीत. आंदोलने केली, नेते मंडळींना निवेदने दिली, रास्तारोको केला तरीही शासनाला काहीच पडले नाही. यामुळे धरणग्रस्तांधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. यास्तव कोयना धरणग्रस्त व अभयारण्यग्रस्त जनतेने राज्यपाल आचार्य देवव्रत यांची भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन दिले. कोयना धरणग्रस्तांचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी ही निवेदनात करण्यात आली आहे.

# विंचूरमध्ये आगळीवेगळी देव दिवाळी

## अवलिया देवसिंग परदेशी यांचा स्मशान दीपोत्सव



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०५, विंचूर (नाशिक) :** परंपरेच्या चौकटी मोडत विंचूर येथील अवलिया देवासिंग परदेशी (देवा भाऊ) यांनी यंदाही स्मशानभूमीत देव दिवाळी साजरी केली. मागील १० ते १५ वर्षांपासून सुरू असलेली ही अनोखी परंपरा गावात चर्चेचा विषय ठरली आहे. देवा भाऊ सांगतात, विश्वातील सर्वात मोठे आणि अंतिम स्थान म्हणजे महादेवाचे. महादेव नेहमी स्मशानात वास करतात आणि शेवटी प्रत्येक माणसाचा प्रवासही इथेच संपतो. म्हणून स्मशानभूमी पवित्र मानून इथे दिवाळी साजरी करतो. या अनोख्या दीपोत्सवात स्मशान परिसर सड्यांनी, रांगोळीने सजविण्यात आला. दीपप्रज्वलन करून भजन म्हणत, नैवेद्य दाखवून फटाके फोडण्यात आले. विशेष म्हणजे, स्मशानाचे जोगी (बाईचा) यांचा सत्कार करून त्यांना फराळाचे पदार्थ व दक्षिणा देऊन सन्मानित करण्यात आले. या वर्षीच्या कार्यक्रमाला आनंदा नागमोते, राजेंद्र क्षीरसागर यांसह गावातील मान्यवर उपस्थित होते. देवा भाऊ यांचे अनोखे तत्त्वज्ञान सब तीर्थ बारबार अमरधाम, एकही बारस्मशानात गेल्यानंतर माणूस परत येत नाही, म्हणून जीवंत असताना इथेही दीप लावावे, प्रकाश पेरावा.

जीवनाच्या अनित्यता आणि मायेच्या नात्यांवर प्रकाश टाकत देवा भाऊ म्हणाले,

बहिण कुणाची, भाऊ कुणाचे, कोण कुणाचे सगे सोयरे? मेल्यावरती एकलत जातील माझे माझे म्हणुनी प्राण्या मायेचा बाजार. - संत तुकाराम महाराज.

अशा श्रद्धा आणि अध्यात्माला जोडून देवा भाऊ यांनी स्मशानभूमीत दीपोत्सव साजरा करून वेगळी दिवाळी उजळवली आहे. गावकऱ्यांकडून या अनोख्या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# आरक्षणात उपवर्गीकरण लागू करा; अण्णा भाऊ साठे क्रांती आंदोलनाची मागणी

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.०४, मुखेड (नांदेड) :** सर्वोच्च न्यायालयाच्या दि.१/०८/२०२४ रोजीच्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या निकालानंतर तेलंगणा, आंध्रप्रदेश,



कर्नाटक, हरियाणा, पंजाब इ. राज्यांनी तत्परता दाखवत तेथील अभ्यास आयोगाकडून एक ते दोन महिन्यांत अहवाल घेऊन आरक्षण उपवर्गीकरणाची अंम लबजावणी सुरू करून अनुसूचित जातीतील आरक्षण लाभ वंचित जातीसह सर्व जातींना आरक्षणाचा समान लाभ देणे सुरू केले आहे. त्यामुळे आता वरील राज्यात अनु.जाती अंतर्गत कुठलाही कलह नसल्याने सर्व जाती एका दिशेने मार्गक्रमण करीत आहेत.महाराष्ट्रात अनु.जातीमध्ये उपवर्गीकरण करण्याच्या दृष्टीने सरकारने सामाजिक न्याय विभागाअंतर्गत दि. १४/१०/ २०२४ रोजी न्या. अनंत बदर समिती नियुक्त केली आहे. न्या. बदर समितीला एक वर्ष होऊन गेला. परंतु फुले-शाहू-आंबेडकर यांच्या भूमीत गरीब वंचित जातींना सामाजिक न्याय मिळण्यासाठी विलंब होत आहे. त्यामुळे मातंग व तत्सम वंचित जातींची भावना संतप्त होत आहे. सरकार विरोधातही मातंग व सत्सम जातींचा रोष तीव्र होत आहे. अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विधेयक तातडीने पारित करून, या निर्णयाची अंमलबजावणी सुरू व्हावी याकरिता म हाराष्ट्रात विविध सामाजिक संघटनांचे त्या त्या जिल्ह्यामध्ये धरणे आंदोलने, उपोषणे, मार्चे काढून या विषयाची तीव्रता शासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. राज्याचे प्रमुख म्हणून आपण समाजास दिलेल्या आश्वासनानुसार व विश्वासानुसार नोव्हेंबर २०२५ अखेरपर्यंत मार्गी लावावा, अशी आमची आग्रही मागणी आहे. अन्यथा हा विषय घेऊन नागपूर येथे हिवाळी अधिवेशनावर प्रचंड असा आक्रोश मोर्चा काढण्यात येईल. तरी न्या. बदर समितीचा अहवाल तात्काळ मागवून घेऊन, अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण लागू करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अण्णा भाऊ साठे क्रांती आंदोलन व लाल सेना या सामाजिक संघटनेच्या वतीने शिष्टमंडळाद्वारे जिल्हाधिकारी मार्फत निवेदन देण्यात आले. शिष्टमंडळात सतीश कावडे, केशव शेकापूरकर, कॉ. गणपत भिसे, परमेश्वर बंडेवार, नागेश तादलापूरकर, शिवाजी सोनटक्के, प्रा. सचिन दाढेल, प्रा.गोपाळ वाघमारे, प्रा.दत्ता हाळदे, सुरेश कांबळे, निवृत्ती नितनवरे, विठ्ठलराव घाटे, एल.डी. कदम, किशोर कांबळे, हेमंत साळवे, अविनाश मोरे, दिलीप कांबळे, कोंडिबा जाधव, संविधान भिसे, निवृत्ती गायकवाड, अशोक उबाळे आदींसह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

# पत्रकार धम्मदाता कांबळे यांना पितृशोक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरांतील भीमनगर येथील माजी पोलिस पाटिल तथा बौद्ध उपासक का.भिमराव संभाजी कांबळे यांचे दि.४ नोव्हेंबर रोजी पहाटे ३:३० वाजताच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले.



मृत्यू समयी त्यांचे वय ७१ वर्ष होते त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, तीन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी मंगळवार, दि.०४ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ४:३० वाजता भिमनगर येथील बौध्द स्मशान भूमी येथे करण्यात आला आहे. सचिन भिमराव कांबळे, सुमेध भिमराव कांबळे, पत्रकार धम्मदाता कांबळे यांचे ते वडील होत.

# ठाणे उत्पादन शुल्क विभागाकडून १ कोटी ३१ लाखांचा भारतीय बनावट विदेशी मद्यसाठा जप्त

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०५, ठाणे :** राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे, मा. प्रविण तांबे (अधीक्षक) मा.वैद्य, पोकळे उपअधीक्षक व ए.डी. देशमुख, उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कल्याण यांच्या मार्गदर्शनाखाली खात्रीलायक गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार परराज्यातील (गोवा) मद्याची वाहतूक होणार असल्याचे समजल्याने पनवेल-मुंब्रा रोडवरील, एक्ससीएमजी प्रा. लि. कंपनीसमोर, उत्तरशीव, ता. जि. ठाणे दिनांक ०४/११/२०२५ रोजी दारूबंदी गुन्हयाकामी गस्त घालत असताना सुमारे सकाळी ०९:३० वाजता आयशर कंपनीचा चॉकलेटी कलरचा सहाचाकी टेम्पो क्र एम.एच-२०- जी. सी-६४५० या वाहनावर संशय आल्याने



सदर वाहनास थांबवुन त्याची तपासणी केली असता वाहनाच्या आतमध्ये परराज्यातील भा.ब. विदेशी मद्य (गोवा राज्यात निर्मित) बॉक्स असल्याचे दिसून आले.

सदर वाहतुकीवर छापा घालून गुन्हा रजि. क्र. ३३६/२०२५, दिनांक ०४/११/२०२५ नोंद करण्यात आला असून त्यामध्ये एकूण १००० बॉक्स परराज्यातील भा.ब. विदेशी मद्य (गोवा राज्यात निर्मित) चे दारूबंदी गुन्हयाअंतर्गत जप्त केले. तसेच सदर गुन्हयामध्ये आयशर कंपनीचा चॉकलेटी कलरचा सहाचाकी टेम्पो क्र. एम एच-२०- जी.सी-६४५० वाहनासह असा एकूण रू. १,३१,५२,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपी क्र. १) मोहम्मद समशाद सलमानी (वाहनचालक) व आरोपी क्र. २) देवेंद्र खुमाराम मेघवाल यांना अटक केली आहे.

सदर कारवाई डी.बी. काळेल, निरीक्षक, पी.यु.निकाळजे, दुय्यम निरीक्षक, ए.एस.वडक्ते, दुय्यम निरीक्षक, अ.गो. सराफ, दुय्यम निरीक्षक, श्री. आर.एन. आडे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक, आर.बी. खेमनर, जवान ब.क्र. ११०, श्री.व्हि.एस. अहिरे, जवान ब.क्र. २४, श्रीमती ए.जे. नगरकर, महिला जवान ब.क्र. ४७, राज्य उत्पादन शुल्क, डोंबिवली विभाग, ठाणे इत्यादीसह हजर आहेत. नमुद गुन्हयाचा पुढील तपास प्रविण तांबे अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी.काळेल, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, डोंबिवली विभाग, ठाणे हे करीत आहेत.

# निवडणुकीचं बिगुल वाजलं; मेढा नगरपंचायतीचं राजकारण तापलं

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०५, सातारा :** मेढा, जावली तालुक्यातील मेढ्याच्या आगामी नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मेढा शहरात राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करताच राजकीय पक्ष, पॅनेल्स आणि संभाव्य उमेदवारांच्या गाठीभेटी, चर्चासत्रं, बैठका यांना वेग आला आहे.




ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा वरचष्मा या नगरपंचायतीवर असला तरीही आमदार शशिकांत शिंदे, माजी आमदार सदाभाऊ सपकाळ, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष वसंतराव मानकुमरे, दिपक पवार, एकनाथ ओंबळे,ज्ञानदेव रांजणे, अंकुश कदम यांचीही भुमिका या निवडणुकीत रंगत आणणारी ठरेल असा अंदाज व्यक्त होताना दिसून येत आहे. मेढा नगरपंचायत सर्वात कमी लोकसंख्या असलेली महाराष्ट्रातील नगरपंचायत आहे. १७ प्रभागाच्या या नगरपंचायतीचा जास्तीत जास्त ३५० लोकसंख्या असलेला प्रभाग आहे.नगराध्यक्षपद महिलेसाठी खुले असल्याने ३ डिसेंबरला कोणाच्या गळ्यात ही माळ पडेल याबद्दल उत्सुकता आहे.गेल्या काही महिन्यांपासून गुपचूप पातळीवर सुरू असलेली राजकीय हालचाल आता उघडपणे दिसू लागली आहे. तालुक्याच्या मुख्य बाजारपेठीमुळे मेढा नगरपंचायतीत सत्ता कोणाच्या हाती येणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मागील निवडणुकीत जवळजवळ चुरशीचा सामना पाहायला मिळाला होता. यंदाही पक्षांतर्गत मतभेद, गटबाजी आणि नव्या चेहऱ्यांचा उदय यामुळे राजकारण अधिक रंगतदार होणार असल्याचं चित्र आहे.ग्रामपंचायतीची नगरपंचायत झाली परंतु म्हणावा असा विकास झाला नाही.उलट काही मुलभूत समस्या उग्र रूप धारण करताना पाह्यला मिळत आहेत.स्थानिक पातळीवर स्वच्छ व पुरेसा पाणीपुरवठा, सार्वजनिक स्वच्छता, आरोग्य, शौचालय, वाहनतळ, करवाढ, रस्ते, कचरा व्यवस्थापन आणि विकासकामांचा ठप्प वेग हेच मुद्दे मतदारांच्या चर्चेत आहेत. तर दुसरीकडे विविध पक्षांकडून विकासाचं राजकारण आणि पारदर्शक प्रशासन या घोषणांनी मतदारांना आकर्षित करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. आगामी काही दिवसांत नवीन गठबंधनं, उमेदवारांची घोषणा आणि प्रचारयुद्धाचा शंखनाद होणार आहे. प्रचार सभा, सोशल मीडियावरूनही नेते आणि कार्यकर्ते एकमेकांवर टीका-प्रत्युत्तरांच्या फेऱ्या झाडताना दिसतील,परंतु यातून बेरजेचं राजकारण होईल आणि नगरसेवक, नगराध्यक्ष निवडून येतील. पण मुलभूत समस्यांच गणित मात्र मेढा वासियांना सोडवत बसावे लागणार कि काय हे मात्र येणारा काळच ठरवेल अशी भावना जनमानसात आहे. दरम्यान, निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याने मेढा शहरात राजकारणाच तापमान वाढलं असून, सर्वत्र कोण घेणार नगरपंचायतीची गादी? या चर्चेला चांगलाच ऊत आला आहे.

# रांजणगाव जिल्हा परिषद शाळेत युकेजी चा वर्ग चालू

**अक्षराज : राजकूमार इकडे**

**दि.०५, सुपा (अहिल्यानगर) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रांजणगाव तालुका पारनेर जिल्हा अहमदनगर या ठिकाणी नव्याने यूकेजी वर्ग सुरू करण्यात आला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा पट वाढवा व विद्यार्थ्यांची पूर्वतयारी व्हावा. या उद्देशाने जिल्हा परिषद शाळेतच युकेजी वर्ग नव्याने सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन सोमवार, दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी पाडण्यात तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री ढवळे तसेच रांजणगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री शिंदे तसेच रांजणगाव येथील श्री शिवाजी विद्यालयाचे प्राचार्य श्री बनकर, सरपंच महेश काका देशमुख, उपसरपंच दादा शिंदे हे उपस्थित होते. या वर्गाचे नियोजन करण्यात आले विशेष करून गावातील सामाजिक कार्यकर्ते प्रियंका शिंदे, राणीताई यादव प्राजक्ता चहाल व शिंदे यांनी विशेष प्रयत्न केले.



या उद्घाटन प्रसंगी पालकांनी तसेच ग्रामस्थांनी विशेष करून या वर्गाचे कौतुक केले आहे. या कार्यक्रमाप्रसंगी मोठ्या संख्येने पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. हा युकेजी वर्ग सुरू करण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक खंडेराव साबळे, उपाध्यापक पठारे संदीप व तसेच उपाध्यापिका श्रीमती गांधाडे यांनी विशेष प्रयत्न केले. हा यूकेजी वर्ग सुरू करून पालकांना व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा सर्व शिक्षकांचे सर्व भागातून कौतुक केले जात आहे.

# पैशाचे पॉकेट मिळाले ते केले परत

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०५, नांदेड :** लातूर ते धर्माबाद बसने प्रवास करत असताना प्रवाशी विनायक शिंदे यांचे पैशाचे भरलेले पॉकेट एस.टी बस मध्ये पडले होते. ती बस दुसऱ्या दिवशी बिलोली ते नांदेड असे जात असताना प्रवाशी साईनाथ सुरनरे हा प्रवास करत असताना ते पडलेले पॉकेट साईनाथ सुरनरे यांना मिळाले. ते पॉकेट काढून बघितले असता त्या पॉकेटमध्ये रोख रक्कम २ हजार रुपये होते व त्या पॉकेटमध्ये मोबाईल नंबर होता. त्या नंबर वर जेंव्हा संपर्क केला असता विनायक शिंदे हे नाव त्यांना समजले. व त्यांचे पॉकेट हरवले असे ते म्हणाले. विचारपूस केली असता योग्य माहिति त्यांनी साईनाथ सुरनरे यांना दिली. त्यावेळी त्यांना आज रोजी धर्माबाद हुन बोलावून घेऊन त्या मिळालेल्या पैशाचे पॉकेट आज सर्व मित्र परिवाराच्या समोर त्यांना देण्यात आले. त्यावेळी डॉ.नरेश बोधनकर, अनिल पेंटावार, साई येप्पूरवार, पत्रकार दत्ता हामंद सर्वजण उपस्थित होते. आपल्या मेहनतीचे पैसे मिळाल्याने विनायक शिंदे यांनी सर्व मित्रपरिवाराचे आभार व्यक्त केले.



# कार्तिकी एकादशी निमित्त वढा येथे यात्रेचे आयोजन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** विठ्ठल-रुक्मिणीच्या या पवित्र नगरीत आज हजारो भाविकांचा समुद्र जमला आहे. भक्तीचा, श्रद्धेचा आणि परंपरेचा हा सोहळा पाहून मन आनंदित झाले आहे. वढा हे केवळ गाव नाही, तर ती श्रद्धेची भूमी आहे. येथे भगवान विठ्ठलाची स्वयंभू मूर्ती आहे, हे वढ्याचे भाग्यच आहे. येथील विकासकामांना लवकर सुरुवात होणार असून श्रद्धेची भूमी असलेल्या वढा तीर्थक्षेत्राची विकासकामांच्या माध्यमातून राज्यात ओळख निर्माण करू, असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. कार्तिकी एकादशी निमित्त वढा येथे यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी चैतन्य महाराज, वढ्याचे सरपंच किशोर वरारकर, भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महिला आघाडी अध्यक्षा छबू वैरागडे, जिल्हा महामंत्री नामदेव डाहुले, तालुका अध्यक्ष विनोद खेवले, महामंत्री मनोज पाल, सविता दंढारे, राकेश पिंपळकर, माजी नगरसेविका पुष्पा उराडे, माजी सरपंच सुनिल निखाडे, महेंद्र वडसकर, मुन्ना जोगी, संतोष भोतकर, अरुण तिखे, सायली येरणे, राशिद हुसेन, नकुल वासमवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, या तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासनस्तरावरून ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यातील पहिल्या टप्प्यातील २५ कोटी रुपयांचा प्रस्ताव आपण मंजुरीसाठी पाठविला असून त्याचे आराखडे तयार आहेत.

या निधीतून येथे पायाभूत सुविधा, सुशोभीकरण, रस्ते, प्रकाशयोजना, पिण्याचे पाणी, विश्रांतीगृह, भाविकांसाठी निवास व्यवस्था आणि यात्रेच्या नियोजनासाठी कायमस्वरूपी व्यवस्था उभारण्यात येणार आहे. या यात्रेच्या निमित्ताने वढा नगरीत प्रचंड गर्दी होते. त्यामुळे भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी आपण यंदा विशेष प्रयत्न केले. यात्रेपूर्वीच बैठका घेऊन प्रशासनाचे शिष्टमंडळ येथे पाठवून नियोजन तपासले गेले. त्यामुळे यंदाच्या यात्रेत अधिकारी, ग्रामपंचायत आणि सामाजिक संस्थांचा सुंदर समन्वय दिसून आला. भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून येथे भोजनदान आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. वाढत्या भाविकसंख्येमुळे वढ्याच्या विकासात आता नव्या संधी निर्माण होत आहेत. येथे धार्मिक पर्यटन आणि रोजगारनिर्मिती होणार आहे.

आपल्या चंद्रपूर जिल्ह्यात अनेक धार्मिक स्थळे आहेत. चंद्रपूरची आराध्य दैवत माता महाकाली हिची महती राज्यभर पोहोचावी म्हणून आपण महाकाली महोत्सव सुरू केला. त्याला प्रचंड लोकसहभाग मिळाला. त्याच धर्तीवर वढ्याचे हे तीर्थक्षेत्रही आपण धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या उंचावणार असल्याचे ते यावेळी म्हणाले. यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतले.

## थोडक्यात

# भारतीय संविधान अमृत महोत्सव; संविधानाचा जागर ५ व ६ नोव्हेंबर रोजी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०५, मुंबई :** यंदाचे वर्ष भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमातून संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे केले जाणार आहे. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कलाकारांना व्यासपीठ मिळणार आहे. छत्रपती शिवाजी नाट्यमंदिर, दादर, मुंबई या ठिकाणी दि. ५ व ६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७:३० ते १०:०० या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.५ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७:३० ते १०:०० या वेळामध्ये गौरवगाथा संविधानाची सादर होणार आहे. या कार्यक्रमाचे दिग्दर्शन अमेय पाटील, संगीत संयोजन योगेश पवार, सुप्रसिद्ध गायक दिनेश हेलोडे, सचिन आगवणे, नितेश मोरे आणि गायिका संगीता पांचाळ, निवेदन प्रतिक पवार करणार आहेत. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी राष्ट्रग्रंथ - आधारस्तंभ लोकशाहीचा हे प्रसाद थोरवे आणि अभिराम भडकमकर लिखित कुमार सोहोनी दिग्दर्शित दोन अंकी नाटक सादर केले जाणार आहे. या नाटकांत ४० पेक्षा जास्त कलाकारांचा समावेश आहे.

गौरव गाथा संविधानाची या कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांची असून या कार्यक्रमास मार्गदर्शन डॉ.किरण कुलकर्णी, सचिव सांस्कृतिक कार्य विभाग यांचे लाभले आहे. रसिक प्रेक्षकांनी या सर्व कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

# काळेपाडा गावातील विद्युत पोल व ट्रान्सफॉर्मर अत्यंत जीर्ण

## ग्रामस्थांकडून महावितरण विभागाकडे तात्काळ दुरुस्तीची मागणी

**अक्षराज : अक्षय गिरा**


**दि.०५, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील हाकेच्या अंतरावर असलेल्या काळेपाडा गावात महावितरण विभागाच्या दुर्लक्षामुळे विद्युत पोल आणि ट्रान्सफॉर्मरची अवस्था अत्यंत गंभीर झाली आहे. अनेक पोल वाकले असून काही ठिकाणी पडण्याच्या स्थितीत आहेत, तर ट्रान्सफॉर्मर पूर्णपणे निकामी झाला आहे. कधीही चालू लाइन असताना वायर तुटून खाली पडतात. ज्यामुळे नागरिकांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. गावातील लहान मुले खेळत असतात, महिला पाणी भरायला जातात आणि जेष्ठ नागरिक रोजच्या कामासाठी या भागातून जात असल्याने कोणतीही जीवितहानी होऊ शकते. गावकऱ्यांकडून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण - एम.एस.इ.डी.सी.एल) शहापूर विभागाकडे सर्व जीर्ण पोल, वायर आणि ट्रान्सफॉर्मर तात्काळ बदलण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात मोठे आंदोलन छेडले जाईल, तसेच कोणतीही जीवितहानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी विभागाची असेल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.



# 'केबीसी'च्या हॉट सीटवर झळकणार जावळीची सिध्दी धनावडे

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०५, सातारा :** सातारा जिल्ह्यातील मेढा,जावळी करांसाठी आजचा दिवस डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरणार आहे. आज रात्री नेमके ९ वाजता, देशातील सर्वाधिक लोकप्रिय ज्ञानमंच 'कौन बनेगा करोडपती (KBC)' या सोनी सेट टीव्हीवरील कार्यक्रमात जावळी तालुक्याची कन्या सिध्दी प्रकाश धनावडे हॉट सीटवर झळकणार आहे. सायघर गावच्या सिध्दीने आपल्या बुद्धिमत्ता, आत्मविश्वास, खडतर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर महानायक अमिताभ बच्चन यांच्यासमोर स्थान मिळवले आहे. ग्रामीण भागातून आलेल्या एका तरुणीने आपल्या ज्ञानाच्या बळावर इतक्या प्रतिष्ठित व्यासपीठावर पोहोचणे हे जावळीकरांसाठी अभिमानाचा क्षण आहे.सिध्दीचा हा प्रवास ग्रामीण महाराष्ट्रातील युवक-युवतींसाठी प्रेरणादायी ठरत आहे. तिच्या यशाने सायघर गावासह संपूर्ण जावळी तालुका अभिमानाने उंचावला आहे. मर्यादित साधनसंपत्ती असूनही योग्य दिशा आणि संधी मिळाली तर ग्रामीण प्रतिभा देशपातळीवर चमकू शकते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे सिध्दी धनावडे. तिच्या या कामगिरीबद्दल जावळीतील नागरिक, ग्रामस्थ आणि शिक्षक वर्गातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून सिद्धी धनावडेचा आजचा यशाचा सोहळा पाहण्यासाठी तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्र उत्सुकतेने प्रतीक्षेत आहे.




# मिरा-भाईंदरमध्ये विद्यार्थ्यांसाठी 'स्टडी सेंटर'चे लोकार्पण संपन्न

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०५, मिरा-भाईंदर :** विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतलं स्वप्न, त्यांच्या हातातली मेहनत आणि समाजाने दिलेली योग्य दिशा या तीन गोष्टी मिळाल्या की, कोणतंही स्वप्न साकार होतं. याच ध्येयाने दिनांक ०५ नोव्हेंबर २०२५ रोजी मिरा-भाईंदर शहरात शिक्षणाच्या नव्या पर्वाची सुरूवात झाली. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी भक्कम पायाभरणी करणे हीच खरी समाजसेवा असल्याचा विश्वास व्यक्त करत, महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत आज हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालन येथे अत्याधुनिक स्टडी सेंटर चे लोकार्पण जेष्ठ चित्रकार पद्मश्री वासुदेव कामत यांच्या शुभहस्ते पार पडले. या स्टडी सेंटरमध्ये आधुनिक अभ्यास सुविधा, विस्तृत ग्रंथालय, डिजिटल लायब्ररी आणि मार्गदर्शन केंद्र विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. UPSC, (IAS/IPS/IRS ) MPSC यांसारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे केंद्र एक प्रेरणास्थान ठरणार आहे.



हे स्टडी सेंटर सुरु करण्यामागे एकच संकल्पना आहे ती म्हणजे मिरा-भाईंदरमधील प्रत्येक हुशार आणि होतकरू विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करून आपल्या शहराचे नाव राज्य आणि देशात उजळवावा.